रयत शिक्षण संस्थेचे,

आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

उद्घाटन व राष्ट्रीय सेवा योजना दिन          दि.२५/०९/२०१८

## अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना दिना निमित्त महाविद्यालयामध्ये दि.२५ सप्टेंबर २०१८ रोजी मा.प्राचार्य डॉ.के.एम.नलावडे (क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड कॉलेज, कुंडल) यांचे रा.से. योजना विभागाच्या वतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानामध्ये प्राचार्य नलावडे साहेबांनी रा. से. योजना विभागाचे बोधचिन्ह व Not me but you विषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी ही रा.से. योजना महत्वाचे कार्य करते. यामध्ये सहभागी स्वयंम सेवकास वैयक्तिक, सामाजिक बांधिलकीची जाणीव होते. विद्यार्थ्यांचा नेतृत्वगुण वाढीस लागतो. एकूणच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना मिळण्यासाठी रा.से.योजना विभाग महत्वाचा आहे. अध्यक्षिय स्थान प्राचार्य, डॉ. एस.टी.साळुंखे साहेब यांनी भूषविले अध्यक्षीय भाषणामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना चालना मिळण्यासाठी व सामाजिक, व्यावहारीक बाधिलकीची जाणीव निर्माण करण्याचे काम एन.एस.एस.विभाग करत आहे असे मत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाची सुरूवात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमा पुजनाने केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कार्यक्रम अधिकारी डॉ.के.बी.भोसले यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रो.श्रीमती एस.जे.माने यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.यु.एस. शेळके यांनी मांडले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.व्ही.बी.पाटील, स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते.

फलनिष्पत्ती - १. रा.से.योजना विभागाविषयी माहिती मिळाली.
२. रा.से.यो. विभागातून व्यक्तिमत्व विकास होतो.

लाभार्थी - ७५





कार्यक्रम अधिकारी
रा. सेवा योजना

PRINCIPAL,
A. S. C. College,
Ramanandnagar. (Burli)